# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ ३१३७/२०१९/सोलापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १
दि.१४.१२.२०२३

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपील अधिकारी तथा |
| श्रीम. भाग्यश्री पांडूरंग गाठे | सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर | गटविकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर |

## विवेचन

अपिलार्थी यांनी दिनांक ०४.०४.२०१९ रोजी केलेल्या माहिती अर्जान्वये 'दि.१६.०८.२०१७ ते दि. ०५.०३.२०१९ पर्यंत दाखल केलेल्या ८ अर्जांवर केलेल्या कार्यवाही बाबत माहिती' मागितली होती. त्यासंदर्भात आयोगाकडे दाखल करण्यात आलेल्या द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दि. १५.०६.२०२२ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

"तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न देऊन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केलेला असल्याने त्यांचे विरुद्ध कलम २० मध्ये नमुद तरतूदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त पासून १ महिन्याच्या आत आयोगास सादर करावा, मुदतीत खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहीत धरून त्यांचेविरूध्द २० नुसार कार्यवाही अंतिम करण्यात येईल."

प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती करमाळा, ता. करमाळा, जि.सोलापूर श्री. अविनाश जरांडे यांनी उपरोक्त द्वितीय अपीलामध्ये पुढीलप्रमाणे खुलासा सादर केला आहे.

'श्रीमती गाठे यांनी दि.०४.०४.२०१९ रोजी दिलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.३०.०४.२०१९ रोजीच्या पत्राद्वारे कळविले की, अपिलार्थींनी १ ते ८ पत्रांच्या प्रती सादर केल्यास पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल. श्रीमती गाठे यांच्याकडून सदर पत्रांच्या प्रती उपलब्ध झालेल्या नसल्यामुळे पुढील कार्यवाही करता आली नाही, असे नमुद करून करून खुलासा मान्य करण्याची विनंती केली आहे.'

उपलब्ध अभिलेखावरुन स्पष्ट होते की, अपिलार्थी यांच्या दि.०४.०४.२०१९ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींकडून सदर अर्जाच्या प्रती मागविण्यासाठी दि. ३०.०४.२०१९ रोजी पत्र दिले. सदर पत्र तक्रार अर्जावरील कार्यवाहीच्या अनुषंगाने दिले आहे. तथापि, माहिती अर्जाच्या

अनुषंगाने माहिती देण्याबाबत वस्तुस्थितीदर्शक मुद्देनिहाय कोणतेही उत्तर दिलेले नाही. उपरोक्त माहिती अर्जान्वये अपिलार्थींनी मागितलेली माहिती त्यांना विभागीय चौकशीत निर्दोषत्व सिध्द करण्यासाठी आवश्यक होती. अपिलार्थींनी दि.१५.०६.२०२२ रोजी सुनावणीवेळी दिलेल्या निवेदनामध्ये नमुद केले आहे की, अपिलार्थींना सदर विभागीय चौकशीमध्ये निर्दोष करण्यात आले आहे. तथापि, जन माहिती अधिकारी हे स्वत: साक्षीदार असल्याने माहिती देण्यापासून जाणीवपूर्वक वंचित ठेवले आहे. त्यामुळे अपिलार्थींना त्यांचे निर्दोषत्व सिध्द करण्यासाठी प्रदीर्घ कालावधी लागला असून त्यांचे आर्थिक व मानसिक नुकसान झाले आहे. यावरून हे स्पष्ट होते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी जाणीवपूर्वक माहिती दिलेली नसून विहित कालावधीत अपिलार्थीस कोणतेही वस्तुस्थितीदर्शक मुद्देनिहाय उत्तर दिलेले नाही. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती करमाळा, ता. करमाळा, जि.सोलापूर श्री. अविनाश जरांडे यांचा खुलासा अमान्य करण्यात येत असून त्यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) च्या तरतुदींचे उल्लंघन केले असल्याने त्यांचे विरुध्द कलम २०(१) नुसार शास्तीची कार्यवाही करणे आवश्यक आहे. सबब, या प्रकरणी आयोग खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती करमाळा, ता. करमाळा, जि.सोलापूर श्री. अविनाश जरांडे यांचा खुलासा अमान्य करण्यात येत आहे. उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभूमिवर नमूद परिस्थितीचा विचार करता, त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(१) नुसार प्रत्येक प्रकरणी रु.२५०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) शास्तीची कारवाई करण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती करमाळा, ता. करमाळा, जि.सोलापूर यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती करमाळा, ता. करमाळा, जि.सोलापूर श्री.अविनाश जरांडे यांचे मासिक वेतनातून कपात करुन सदर रकमेचा भरणा "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही सदर आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत करावी व कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

प्रस्तुत द्वितीय अपील अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जा.क्र.

प्रति,

श्री. अविनाश जरांडे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती करमाळा, ता. करमाळा, जि.सोलापूर

प्रत- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांना उपरोक्त आदेशानुसार माहितीस्तव व उचित कार्यवास्तव अग्रेषित